
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २९३९
२१७ १९८२




REFBK-0018592
REFBK-0018592

२१३१ काव्य
संदर्भ
८११०९
८।१।८४

फ. मुं. शिंदे

# जुलूस

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र.
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0018592

REFBK-0018592

अस्मितादर्श प्रकाशन, ३७, लक्ष्मी कॉलनी, औरंगाबाद (द.)

अस्मितादर्श प्रकाशन : १

प्रकाशन : जानेवारी १९७२

© फ. मुं. शिंदे

**वेष्टन व रेखाटण :**
भ. मा. परसवाळे

**किंमत :** चार रुपये

**मुद्रक :** ज. रा. बर्दापूरकर
जयहिंद प्रिंटिंग प्रेस
सन्मित्र कॉलनी,
औरंगाबाद.

**प्रकाशक :** प्रा. गंगाधर पानतावणे
अस्मितादर्श प्रकाशन,
३७, लक्ष्मी कॉलनी,
छावणी, औरंगाबाद.

**कविता प्रकाशन :**
प्रतिष्ठान
अस्मितादर्श
वैखरी
विविधा
मांडवी
सत्यकथा
अभिरुचि इ.

… ज्यानी माझी कविता जगवली
त्यातील–

---

शेख शफी
गणेश दुधगावकर
या दोस्तांना

... ज्यांचे ऋण शब्दातीत आहे–

---

प्रा. दि. के. बेडेकर

प्रा. गंगाधर पानतावणे

गुरुवर्य डॉ. प्रभाकर मांडे

आणि

प्राचार्य रा. रं. बोराडे

प्रा. सुधाकर अहंकारी

भ. मा. परसवाळे

संग्रह शाखा (स्थळ प्रत)

## प्रस्तावना | दि. के. बेडेकर

लहानमोठ्या त्रेचाळीस कवितांचा हा संग्रह आहे. बहुतेक कविता लहानच, काही चार ओळींच्या आहेत. ही एक कविता पाहा :

> "डोळ्यांतून रसायन पेटवताना
> कसला अर्थ ओठांत सजवत होतीस?
> मनं स्फोटात सोलून निघताना
> आकाश नेसण्यात का रमली होतीस?"

सारे शब्द सोपे आहेत. "रसायन" या शब्दाला एक चालू अर्थ लाभला आहे. हातभट्टीचे "रसायन"! तो सोपा म्हणजे लोकपरिचित अर्थच येथे प्रथम घ्यावासा वाटतो. "प्रिये ! तुझ्या डोळ्यांत पेटते रसायन आहे. पण ओठांत तू कसला तरी अर्थ सजवीत आहेस ! " हा

ओठातला अर्थ सजून भुरळ पाडणारा, लाडावणारा अर्थ आहे. पण " तुझे आणि माझेही मन " स्फोटात " सोलून निघत आहे " असे कवीने लगेच म्हटले आहे. " रसायना " चा हातभट्टीसंदर्भित अर्थ मग कच्चा वाटू लागतो. दुसरा अर्थ घ्यावासा वाटतो. हे गल्लोगल्लीचे रसायन नसून रसायनशास्त्रज्ञांच्या भट्टीत तयार झालेले, स्फोटाची विध्वंसक दाहक शक्ती असलेले रसायन वाटू लागते. मनांची कातडी सोलून त्यांना जखमांचे नागवेपण देणारा दाह या स्फोटात आहे.

या कणिकेची चौथी ओळ वाचली तेव्हा माझ्या तरी मनात एक वेगळेच चित्र तरंगू लागले. " डोळे " आणि " ओठ " यांनी सूचित होणारी प्रेयसी दिसेनाशी झाली. उरले फक्त मन. पण " तिचे व त्याचे " मन नव्हे, तर तीव्र दाहाने सोलवटून नागवे झालेले आपले मन, माणसांचे मन. हे मन " आकाश नेसण्यात " रमले आहे. का रमले आहे ? हे " आकाश " फाटके आहे का भरजरी पैठणीसारखे आहे ? " नेसण्यात रमताना " आपले मन भ्रांत आहे का ?, का ह्या रमण्यातच आपल्या मनाचे मनपण आहे ? " आकाश " नेसून नागवेपण झाकले जाईल का ? दाह शमेल का ?

अशा काही संदिग्ध परंतु खोल, जिव्हारी लागणाऱ्या परंतु आत कोठे तरी जिव्हाळ्याच्या वाटणाऱ्या प्रश्नतरंगापर्यन्त कवितेने रसिकाला पोचवले तर आपण म्हणतो की ही चांगली कविता आहे. शिन्दे यांच्या संग्रहातील बहुतेक कविता या कणिकेच्या जवळपास आहेत.

## तरुण–युग, व्यथा–युग

शिन्दे हे तरुण कवी आहेत म्हणून या युगाचे "लेणे" त्यांना लाभले आहे. हे व्यथेचे युग आहे. वृद्ध रागावून म्हणतील की, "आम्ही व्यथा भोगल्या आहेत. व्यथेचे हे अवडम्बर आम्हाला नाटकी वाटते." वृद्धांची ही अपमानित रागाची भावना मला समजू शकते – कारण मीही वयस्क आहे. पण हा राग एका अर्थी अनाठायी आहे.

आज जे वयस्क आहेत त्यांनी, त्यांच्या वडलांनी, आजोबांनी व मागेमागे जात अति-पंजोबांनी व्यथा भोगल्या आहेत, ह्यात संशयच नाही. पारतंत्र्यासारख्या राष्ट्रीय व्यथा आजच्या वयस्कांनी भोगल्या, आणि ती व्यथा संपल्यानंतर आजच्या तरुणाचा जन्म झाला आहे. अनेक जुन्या व्यथा अशा संपल्या आहेत. या दृष्टीने आजचे तरुण भाग्यवान आहेत ! पण तरुणांच्या व्यथांना "नाटकी" म्हणून आपल्या व्यथांचे अवडम्बर माजविण्यात वयस्कही काहीच साधीत नाहीत.

प्रश्न साधा नाही. व्यथा मोठ्या कोणाच्या? व्यथा भोगल्या कोणी? हा खरा प्रश्नच नाही. "मानवी जीवन" ही देव व अप्सरा यांच्या स्वर्गसुखी जीवनाची पृथ्वीवरील आवृत्ती आहे. (पेपर–बाऊंड, स्वस्त पण वाचता येण्यासारखी आवृत्ती आहे.) असे आजवर कोणी मानले नाही, व आजचा तरुणही तसे मानीत नाही. आज व काल आणि उद्याही व्यथा राहणारच. त्या भोगताना माणसाने कण्हणे, हे स्वाभाविकच आहे. फरक कोठे पडतो ? ते खरे महत्त्वाचे आहे.

व्यथांचे भोगणे निमूट असू शकते. यातही दोन तऱ्हेचे निमूटपण असते. एक असे की, मी माझे दुःखही निमूटपणे भोगतो, माझ्या वाट्याला हे आहे असे मानून भोगतो ; आणि इतरांनाही आवर्जून सांगतो कीं दुःखाबद्दल कण्हू नका, डोळ्यांत आसू न आणता धैर्याने दुःख भोगा ("जगरहाटीप्रमाणे मेला त्याचे दुःख करून काय होणार?" हा सांत्वनपर उपदेश स्मशानात चाललेला असतोच!) हे निमूटपण समजू शकते व यात "माणुसकी" असते.

प्रारब्धवादी माणसे, कर्मवादी माणसे आणि परमेश्वरी न्याया-वर खरी श्रद्धा ठेवणारी माणसे हा निमूटपणा पत्करतात. सर्व धर्मांच्या परंपरा याची शिकवण देतात. कर्मयोग, अनासक्तियोग यांचा गाभा या निमूटपणात आहे.

दुसरे निमूटपण अमानुष असते व ऐहिकातच लडबडलेले असते. यात शहाजोगपणा असतो "श्रम विभागा"च्या, नाहीतर "जन्मजात विषमते"च्या पायावर सत्तेची, मत्तेची, पांडित्याची व पवित्रतेची उतरंड जुन्या व नव्या संस्कृतीत रचलेली दिसते. या उतरंडीतले वरिष्ठ वर्ग व त्यातील व्यक्ती असे मानतात की सुखदुःखाची वाटणी "कर्मामुळे" किंवा अंगच्या गुणांमुळे झालेली असते, व म्हणून व्यथा ज्यांच्या नशिबी असेल त्यांनी निमूटपणे ती भोगलीच पाहिजे. या तत्त्वज्ञानाच्या आहारी गेलेला माणूस मानू लागतो की इतरांनी आपापले दुःख निमूटपणे भोगावे. हेवा स्पर्धा करू नये. पण मी मात्र स्वतःचे, स्वतःच्या कुटुंबाचे व जवळच्यांचे दुःख सहन करणार नाही! असेल नसेल ती ताकद, युक्ती व डावपेच वापरून मी सुखासाठी धडपड करीन

व ते मिळवीन, इतरांनी मात्र अशी धडपड करू नये. कारण सुखासाठी धडपड ही अमंगळ आहे. व्यर्थ आहे! "जगरहाटी दुःखमय आहे" हे सूत्र मग अमानुष ठरते. कारण यात "आपले" व "इतरांचे" यात तफावत ठेवली जाते, दुटप्पी मामला असतो, ढोंग असते, सुखवाद असतो.

तरुणांच्या युगाची, आजच्या युगाची, व्यथा ही वरील दोन्ही प्रकारच्या निमूटपणाचा स्वीकार न करणारी व्यथा आहे. "सर्वांनी दुःख सहन करावे" असेच जर मानवी जीवनाचे सूत्र मानावयाचे, तर मग या जीवनाची व अवघ्या विश्वाची रचना बाष्कळ मानली पाहिजे; दयाघन परमेश्वराची ही अतर्क्य लीला आहे असे काही तरी फसवे बोलून वंचना करू नये. तरुण मनाची अशी काही तरी धारणा आज झाली आहे.

संग्रहातल्या एक कवितेचा शेवट असा आहे:

> **"रागावलीस? जाऊ दे. आयुष्यच खरे नाही**
> **पाहा ना, उत्कटलेल्या ओठांवर विषाची साय आहे."**

आणखी एका कवितेत :

> **"आकाश थकलेले दिसते सर्व अवयवांसारखे**
> **कोणा हाताने खुडून टाकले मला**
> **मी बुडून गेलोय समुद्रात माझ्याच आतल्या"**

माणसाचीच नव्हे तर साऱ्या वस्तुजाताची एक निरर्थ, ओंगळ व्यथा कवीला जाणवू लागते :

"माझ्या दुःखाची काय कथा तेव्हा
एक एक वस्तूस असंच इथं सोसावं लागतं"

अशा एक विराट बाष्कळतेची जाणीव व व्यथा तरुण मनाला वाटत आहे. एका परीने, सर्वच धर्मपरंपरांनी व संस्कृतींनी दाखविलेल्या "आकाशा" चे हे उफराटे प्रतिबिंब आहे–मानवी जीवनाच्या क्षूद्रतेच्या डबक्यात पडलेले प्रतिबिंब आहे.

## संवादाची अशक्यता

माणसाला इतर माणसांशी संवाद हवा, इतर वस्तुजाताशीही संवाद हवा. सुखसंवाद असो वा शिव्यागाळी असो, पण सांधा हवा. साऱ्या वस्तू जर मुक्या, बहिऱ्या व आंधळ्या असतील, स्पर्शहीन व गंधहीन व रसहीन असतील तर मग माणसाला वेड लागेल,–कारण माणसाला कान, डोळे, त्वचा इत्यादी इंद्रिये आहेत व त्यांच्या मागे मन आहे. पण आजच्या युगव्यथेमुळे तरुणांना भासत आहे की सारेच अबोल आहे, मृतप्राय आहे, उध्वस्त आहे.

'माझा उध्वस्तपणा आंथरून कसले हे उत्सव तुझे ?'

असे एका ओळीत कवी म्हणतो.

संवादाबद्दल तो म्हणतो :

"मनापुरते काही संवाद काही ओळी
माझ्यासाठी, तुझ्यासाठी

एकूण दोघांच्या जिवंत नसण्यासाठी
परस्परांपलीकडे दोघंही मेलेलो
दोघंही जिवंत असतो पडदा धरून "

## काही वेगळे होईल का?

शिन्दे यांच्या कवितेसंबंधी, तिच्यातील उध्वस्तपणाच्या, व्यथेच्या, तरुण जाणिवेसंबंधी, येथवर कल्पना आली असेल. या व आजच्या काही कवितांमधून कोठे तरी "आशेची पालवी" डोकावते. मानवी जीवन व्यथेचे व बिनअर्थाचे आहे. एवढेच हा कवी सांगत नाही. हे सांगतो व मधूनच असेही म्हणतो :

" चंद्राचं फूल देऊन सत्कार करील आकाश तेव्हा
तू बोलशील की, चांदण्या सर्वांच्याच आहेत "

जीवनाला तसा, म्हणजे बाहेरच्या कोठल्या विराट शक्तीचा, आधार नसेल, बाहेरचा अर्थ नसेल व हेतु नसेल. नसो बिचारा! आजचे व्यथित मानस अशा बाह्याची आशाच ठेवीनासे झाले आहे.

पण पूर्वी कधी, कोणत्याही युगात वा संस्कृतीत, जाणवली नव्हती अशी एक नम्र परंतु दृढ अस्मिता मानवी मनात उदयास येत आहे. हा कवी म्हणतो :

" असेच असेल भटकायचे अस्ताच्या काठावरून
तर होऊ या आपणही स्वयंप्रकाशी मार्गावर "

आणखी एका कवितेत म्हणतो :

> "सगळी निळाई कोरी कोरी अनुभवून मेली युग
> एक साचा उमटेल त्यावर कधीतरी पुढे मागे"

हा साचा कोणता? नारायण सुर्वे यांच्या कवितेतून आढळणारी "ध्वजा" व "समतेचे स्वप्न" या कवीच्या ओळींतून कधीकधी उमटतात. पण सुर्वेही विद्रोहाला एखाद्या "साच्यात" बंदिस्त करीत नाहीत व या कवीनेही तसे केलेले नाही. विद्रोहाची भाषा ही या तरुण युगाची भाषा आहे, नव्हे आज जिवंत मनाने जगणाऱ्या माणसाचीच ती भाषा आहे.


या विद्रोहाचा रोख कुठे आहे? तर असे म्हणता येईल की माणसाची इतरांशी, वस्तुजाताशी व स्वतःशीही फारकत करणाऱ्या साऱ्या जड संस्कृतीविरुद्ध हा रोख आहे. सारे मार्ग या जडतेने रोखले आहेत. पिळणुकीच्याच नव्हे तर प्रतिष्ठा, परंपरा व माणूस म्हणून स्वतःला व इतरांना ओळखण्याबाबत आळस व दुष्टता, यांनी मार्ग अडवले आहेत. शिन्दे एका कवितेत म्हणतात : "**जवळिकेसाठी झिजत जाणाऱ्या सडकेच्या काठासारखा**" मी "हाकेचे हात" लांबवीत होतो. ह्या "जवळिके" साठी स्पर्शासाठी, माणूस आज विद्रोही बनू पाहात आहे. स्पर्शहीन गुळगुळीत व दगडी बनलेली समूहता माणसाला जाचीत व कोंडीत आहे. कवीची व्यथा यात आहे. व बंडही याविरुद्ध आहे.

मला या संग्रहात काही कविता फार सामान्य वाटल्या, (हिरोशिमा–जपान यांची आठवण दाहक असली तरी आता झिजून

विझत आलेली आहे) ; काही इंग्रजी शब्द, ग्रीक देवता, "नोमड," सारख्या चीजा, मला वाटते थोड्या रसिक तरुणांना ओळखतील, आणि प्रयासाने त्यांची ओळख होणे कवितेच्या सुलभ आकलनाला आड येईल. अलीकडच्या तरुण कवींनी अगदी बोलभाषेत, संस्कृत आणि इंग्रजी शब्दांवाचून बोललेल्या लोकबोलीत कविता लिहिण्याचा प्रयत्न चालविला आहे. पण मध्येच "अपोलो" व "मर्डर" येतात, "आत्म्याची कक्षा" येते! शिन्दे यांना या अडखळणाऱ्या गोष्टींचा हव्यास नाही. पण कोठे कोठे ठेच लागते.

ह्या साऱ्या गोष्टी किरकोळ आहेत. मुख्य म्हणजे संग्रहातून एक तरुण कविमन त्याची व्यथा साकार करते, सच्चेपणाने व सहजतेने करते. काही तरुणांच्या कवितांतून अट्टाहासाने येणारा नवखेपणा, व प्रदर्शनाच्या आवडीतून येणारा बीभत्सपणा तर येथे नाहीच व दुर्बो–धतेचा नखराही नाही. यालाच मी सच्चेपणा म्हणतो आणि म्हणूनच या कवीचे मी स्वागत करतो.

● ●



जुलूस

दहा

१

जीवाचे पंचनामे खरडताना रस्त्यावर
काही एक वाटलं नाही आमचं आम्हाला
हा पंचनामा. तो पंचनामा. इथला... तिथला
खोटा... खरा. सारे हळूहळू सोयरे झाले.
कोणाजवळ पेश करावेत जीवांचे जीवनामे ?

२

काळोखडोळे कुणाला बांधताच आले नाही नजरात
खूपदा भिजले स्वतःहून ठिबकेपर्यन्त
पण नव्हते मनसोक्त घळघळून ठिबकले,
भिजून भिजून आपणच भिजले.
( युगालाही वाटत होते भिजवावे कोणी तरी ! )
काळोखडोळ्यातला येथून पुढे प्रकाशपूर
ध्वंसून विस्तारेल तुमच्या – माझ्या पात्रास तेव्हा
कोण सावरेल कुवतहीन नजराना ?
काळोखडोळ्यांनो, स्वागत असो आसवांचे
एकदा यायलाच पाह्यजे पापणीखालच्या तुमच्या जत्रेत.

८११०१ २१३१ काव्य

३

युगासाठी थांबणार कोण कोणा स्टेशनवर
आम्ही नोमॅडस् वाटेल तिथे पाल देतो
जंगलात ... हिरवळीत .. कधी तर स्वतःभोवती
वेष्टून घेतो पालाचे कापड आणि अनुभवतो
जातींची कंगालखोरी वांझेसम
तरीही अपघात घडत नाही आमच्या क्षितिजावर
आम्ही निर्धास्त असतो दुसऱ्या मुक्कामी
पुढचे स्थळ रफू करीत विचारात
आम्ही नोमॅडस्
थांबत नाही युगासाठी
युग नको त्यात काढलेले रंगवून !

४

आत्म्याची मालमत्ता विकून
एका रात्रीपुरता केलाय तुझ्याशी सौदा
म्हटलं पाहावं विसरून संस्कारप्रणीत थेअरीज
दोन घरांच्या व्याख्या तफावतीसह अभ्यासून.
एक घर : माझं. भाड्याचं. भलत्याच शहाण्या भिंतीचं.
( खरं पाहता भिंतीचेच संस्कार अधिक ठस्सेदार !
तिचे सारवलेले उपदेश चुनामातीचे किस्सेदार ! )
दुसरं : तुझं. हे. स्वतःचं. वखवखल्या कॅलेंडरी निरुत्साही भिंतीचं.
आणि ते कशाला लावलंस कॅलेंडर द्रौपदीच्या वस्त्रहरणाचं ?
अधिक चौकशीत पाय फसवून
रात्र होणार नाही सगळी चालून.
चटकन बहाल कर मला हवी असलेली
एक सेक्युलर नाईट : मनं चाटणारी !

उजेड गिळून अखेरच्या शोनंतर
टॉकीज, तसा काळोखवाणा कधी कधी तू उदास.
पडलेल्या भिंतीने जीवनाला मोजून पाहताना
अनेकदा हारतोस, 'कैसा रे शिंदे, जिंदगी का ?'

●

तिनंही आईसारखे अत्तराचेच श्वास घेऊ नयेत
म्हणून तुझ्या मनाची 'हिरवी माडी' झाली. तीही हसायची.
'लेकीन आपुन ऐसे. समाअेंगी आपनेमें ? क्या मां ?'

●

ज्वानी ओतली वडलांनी पेटीतून बारीत वावरताना.
आता ताडीशी अनुनय. 'क्या मामू गये थे शायद' तुझे पुसणे –
'नय बाबा, इमानसे पिकर नय आया' - एवढ्यात झोक जाणे.

●

घरातल्या प्रत्येक आयुष्यावर कुठं तरी दुःख छापलेलं
तू एक एक पान जोडतोस तुझं नवीन कुराण बांधण्यासाठी.

●

टॉकीज गच्च असते लोकांनी
तसा अेखादे वेळी तू तिला आठवण्याच्या उत्सवात.

●

६

परिचय पदराशी बांधून
एक एक ठरवतोय निशाणी
जगायचं हे गृहीतच आहे
तेव्हा पाणावतील माझी नाणी.

७

नाही तरी कफल्लकाजवळ
डोळ्यांशिवाय काय कुठले
फकिरी स्वप्नें पेरताना
कुणास ठाऊक आभाळ मात्र चरकले.

८

आयुष्याची तू दीर्घ रात्र व्हावीस
तुझ्या दुःखाच्या काठावरून भेटताना वेळोवेळी,
उगाच लिहून काढला काळोखातला हा संवाद.

तुझे आयुष्य घेऊन आलीस तू चांदण्यांच्या झालरीचे
तर मी चंद्राचा मर्डर करीन, हेही आठवून गेले.

– साऱ्या शहराचे डोळे घराघरांतून पेट घेत असतात तेव्हा
तोच जमिनीचा तुकडा समजावतो, ती नाहीय ना सोबतीला !

९

दोरे नारूचे लांबताना तुटणारे
तुटण्यातून लांबणारे सतत ... सारखे ..
दुःखाला का असूच नयेत सीमा ?
आयुष्याचा पू होतो, त्या घडीस
जाणवत नाहीत आपल्याच वेदनामेल्या जखमा

१०

तुला पेलतील का भूवेडे
जीवाच्या अध्ययनाचे अर्थ
खड्गाच्या धारेवरून गुजरतात
मी कवटाळलेले ईश्वर.

११

तुक्ताच तर कुठं संपवलाय पहिला प्रवेश !
मीच नट ... मीच प्रेक्षक. माझ्यातच मी उभा
गालावरती अश्रूंचे संवाद नोंदवून, गोंदवून
सारीच कळवायचीत स्वगतं तुझ्या माघारी तुला !
वाटल्यास प्रवेश कर शेवटच्या प्रवेशात तू
भळभळतील मृत्युपत्रातल्या जखमा तिथं माझ्या;
पण ओढू नकोस थरथरत्या हातांनी पडदा मात्र ...!

१२

हरेक मोसम बेइमान झाला कवितेशी
अभावितपणे तुझे डोळे भविष्य पेरून गेले तेव्हा
वाटलं कंगालाच्या जाणीवा स्वीकारतील का
तुझ्या पापण्यांमधील स्वप्नांचे संपादक ?
काय उगवेल याची वाट पाहतोय् मी ... ... ...
काळजी करू नकोस काळोखाला दिवस गेलेत !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अ. क्र. २८५०२

१३

बावटयाच्या ज्वाळा तुला शिलगवतील
तुझ्या क्रुद्ध पल्ल्यात. तुझा मशाली देह
निशाणासारखा फडफडेल नेतृत्वाच्या मैदानात.
चंद्राचं फूल देऊन सत्कार करील आकाश तेव्हा
तू बोलशील की, चांदण्या सर्वांच्याच आहेत !
तुझ्या पुढचे सगळे दोस्त वणव्यागत हसतील
तूच तर वेद पढवलेत त्यांना साम्याच्या लिपीतील !

१४

उध्वस्त जीवनातले सिद्धांतच जेव्हा
ठरले मातीमोल
साधनांचे धुमारे मुक्याने मुसमुसून
जगण्याचे ठरवू शकले नाही मोल .
मातीशी जखडलेला बहकलेला पीर
मृत्यूच्या सिद्धतेतही कुच ठरला
कवितेसारखी एकच खूण तेव्हा त्याला
विश्वास म्हणून सापडून गेली.

१५

तुझा कुंचला
केस विस्फारून
कॉमरेडासारखा
आज बेचैन का ?
काढणार होतास ना
आक्टोबरच्या क्रांतीचं
एक लळलळतं चित्र
ज्यात तू दिसणार होतास,
तुझ्या दृष्टीतलं तापलेलं पोलाद
आणि वीर्याचा एक ओघळ
कलावंताच्या कैफाच्या !
मी लावलं असतं ते चित्र
गल्लीबोळातून, चौकाचौकातून
आणि सांगितलंही असतं लोकांना :
हीच बरं का आई लेनीनच्या देशाची.

१६

फुलत्या वेदना पानापानावर जोखल्या
अस्पृश्य गंधामधून
मोकलणारे दोन संस्कार माझे जोपासतांना
परागनजरा कां म्हणून रोखल्या ?

१७

चढवत चढवत बरेच चढवले मजले
अजूनही सांगता येत नाही, चढतील किती
इमारतभर अश्रू नांदतील
सरपटतील मजल्यामजल्यातून दुःखाचे नाद,
मजले दुःखाचे आहेत.

८११०६ काव्य
२९३१ ८१९१०

१८

रात्रीनं जवळ केलं तो–तो
आत्म्याला चिकटत गेले शब्द.
रात्र कुरवाळायची काळ्या पदराखालून
पदरात बांधून ठेवायची डोळ्यातले पाणी;
रात्रीत दुःख चिंब होताना
उजळून निघायचे आगटीतले शब्द.
रात्रीनं जवळ केलं तो–तो
डोळे कलंडून आम्ल सांडले !

१९

नोंदवता येत नाहीत काही रात्री
कांही श्वासांना असत नाही भाषा त्यांची
मुके मुके दंशताना ओळखीचे स्पर्श
फुटत नाही झेंडू माझ्या जाणिवांना.
मी रंगवतो चित्रावरचे तुझे गाल
म्हातारी रात्र रंगांना शापित असते त्या घडीस.

२०

तारा लावताना तू होतीस
डहुळलेल्या पाण्यासारखी
लखलख हलल्या जीवाच्या फांद्या
हाडांमधून सूर पाझरताना.
कोणाला हवे होते इमल्याचे रसिक
झोपड्यांचे श्वास तुक्याचे माझ्या;
गात होतो तुझीच तर गाथा
अन् तू उठून गेलीस !

२१

घराची ताटीच जेव्हा कण्हायला लागते
माझ्या दुःखाची काय कथा तेव्हा.
एक एक वस्तूस असंच इथं सोसावं लागतं
चेहरे हसरे ठेवून
झाकावी लागते जर्जरावस्था;
सारं ठिबकायला लागतं घरंच
तेव्हा निराळी नसते माझ्या अश्रूंची जात.

२२

गुलामांच्या अश्रूंसारखी तू तुझ्यातच पेटत होतीस
डोळ्यांच्या खरेदीसाठी बाजारात आलो तेव्हा दिसले.

डोळे घेऊन मी परतलो तळात नेणाऱ्या तुझ्या खोलपणासह
आयुष्याच्या चिंतनात तू अधिक एक मिळविलास नकळत.

मी स्वप्नं पाहतो चार डोळ्यांनी रात्रींना लगाम घालून
कधी आभाळभर ओळी लिहितो; कधी काही दिसतच नाही. तू सुद्धा.

चार डोळ्यातला भयाण अंधार कुठल्या चितेवर पेटवून द्यावा ?
तू तुझ्यातच पेटतेस म्हणून !

२३

दुखणारे खुपणारे बरेच जगलो.
हिर्व्यापेक्षा पिवळ्या पानांना जपलो.

सूर्याच्या कल्पून पाहिल्या जखमा
वेदनांच्या वजाबाकीचे उत्तरही वेदना.

समजावण्यापलीकडे भूमिकाच उरली नाही
देऊन टाकले पराभवाला सगळे प्रेम.

२४

म्यान्यात राहू दे आठवणींना
समर्पणास आहे वेळ अजून
लिहून काढायचेत संवाद रात्रीरात्रीमधले;
उजेडाचे करताना स्वागत तुझ्या नगरीत
आयुष्याचा बळी घे वाटल्यास जुलुसात !

२५

केळीच्या घडासारखे
दैन्याचे गर्भ
पोटाशिवाय वाढणारे उघड्यावर.
तुटता तुटत नाही
नाळाचा जाडजूड देठ
किती बोंबलावं टचांहाऽ टचांहाऽऽ
टरकणाऱ्या पानागत केळीच्या !

२६

त्याग वाटवून आता तीर्थाटन
पापाची तहान गंगाओठी.
माझे रामायण माझी गीतामाय
हुळहुळे पाय फासावर.
आत्म्याच्या कक्षेत पेटले अॅपोलो
तेव्हा चंद्रावलो देहासाठी.

२७

तुमच्या रात्रींना केव्हाच आशीर्वाद दिलेत
तुमची स्वप्नें सहीसलामत तीर गाठतील.

आमच्या स्पंदनांना शीर्षके कुठली आलीत
आशय पेलताना तुम्ही डोळ्यात कैद होता.

या पुढचे सारे अभंग लिहूत तुमच्यासाठी
तुमच्या प्रतिमांना चितेसारखी जागा नाही.

२८

युगाचे साचे बदलत बदलत आले
आकाशाचे सगळेच कॉलम रिकामे राहिले.

इतिहासातल्या रक्त आटलेल्या जुन्या बातम्या
नव्याने शिकतो; ढगांतून रक्त सांडत नाही.

सगळी निळाई कोरी कोरी अनुभवून मेली युगे
एक साचा उमटेल त्यावर कधीतरी पुढे मागे.

२९

काय सांगू काही नाहीच तसं नावाखेरीज;
कोणीच आपलं नाही,
खरं तर तूही नसू शकतेस माझी !
रागावलीस? जाऊ दे, आयुष्यच खरं नाही
पाहा ना, उत्कटलेल्या ओठांवर विषाची साय आहे.

३०

कलत्या बुबुळात तुझ्या
हिरोशिमा
पेटलेले
विझलेले;
मी जपान सजवतो.

३१

असेच असेल ठरवले तर हरकत नाही
चालू या वाटांना कविता पढवीत.

कोणी थांबवले नाही, आपणही थांबलो नाही
कसला म्हणून शोध नव्हता आजवर डोळ्यांनाही.

असेच असेल भटकायचे अस्ताच्या काठावरून
तर होऊ या आपणही स्वयंप्रकाशी मार्गावर

३२

डोळ्यांतून रसायन पेटवताना
कसला अर्थ ओठांत सजवत होतीस ?
मनं स्फोटात सोलून निघताना
आकाश नेसण्यात कां रमली होतीस ?

३३

बिघडत गेले आकार रेखाटलेले मनात मनासारखे
माझाही आकार बिघडला. मी बिघडलो. आणि तू ?
वास्तविक तूही. पण दंगून गेलीस उत्सवात. का ?
माझा उध्वस्तपणा आंथरून कसले हे उत्सव तुझे ?

३४

तुटलेले सांभाळलेले रिळांचे तुकडे
तू सिनेमा अेका रात्रीचा त्या.
अेक रात्र सिनेमाची फक्त प्रौढांसाठी.
तू रात्र तू सिनेमा तू प्रौढ
रिळांच्या तुकड्यात मी तुटलेला...!

३५

तू निघालीस
मी निघालो
पल्ला गाठायला
हे सारे निघाले.
मी कविता वाचीन
तू सर्वांना सांग
दिशांचे पायावर
प्रेम जडले.

३६

पावलं ओळखून निघ
जरूर गवसेल माझी दिशा
मी थबकलो नाही जरी
तरी तू गतीनंच धाव.
कदाचित् थोडे पूर्वी मला
पण तुलाही पोचता येईल
इतका रस्ता सोपा आहे.
पुढं मुक्त व्यथांचा तो गाव !

३७

माझ्यापलिकडं तुझं जिवंत असणं
अनेक दिवसाचं.
मनापुरते काही संवाद काही ओळी
माझ्यासाठी, तुझ्यासाठी
एकूण दोघांच्या जिवंत नसण्यासाठी
परस्परांपलिकडं दोघंही मेलेलो
दोघंही जिवंत असतो पडदा धरून.

३८

जवळिकेसाठी झिजत जाणाऱ्या सडकेच्या काठासारखा
येणाऱ्या दिवसाकडे हाकेचे हात लांबवत होतो
मनाला चिकटलेले तिच्या भोवतालचे संदर्भ माझ्यापुरते
मी लावले होते
तिने दुःखही बहाल केले नाही
फितूर झाल्याचे समजले पर्याय म्हणून मीच दिवसांना
मालवले होते.

३९

दुःख पेटत पेटत आयुष्य पेटत जाणार नाही ना ?
जाळ धरणाऱ्या सवयी दुःखाच्या आहेत.
व्याख्येत फ्रेम करून टांगलेले भोवतालचे जगणे आणि
मी ? ? ? ? ? ? ? ? हा असा दुःखलिंपित
शेवटी दुःखालाही बेवारशी जन्म असत नाही ना ?
त्याला कवटाळणारे अश्रूंचे हात माझे असतात !

४०

तसा कुठलाच आणि कसलाच अन्वयार्थ
लावता आला नाही आजपर्यंत;
एक नाही प्रसंग कोरा निपजला
रफूचे वण नसलेला
फाटकेपणाला जुळवून वरचेवर
असे कधी वाटलेही नाही
खोडून काढावा आयुष्यातला विधवा मजकूर.

४१

मुदती तापातून उठल्यासारखे.
मन सारखे पराभूत होत असते क्षीणतेत
आकाश थकलेले दिसते सर्व अवयवांसारखे
कोणा हाताने खुडून टाकले मला
मी बुडून गेलोय समुद्रात माझ्याच आतल्या !

मराठी ग्रंथ संग्रहालय

४२

उसवून उसवून गेलीस तू ......
कैद्यासारखं उभ्या उभ्यानं
उगाच आकाशाला नजरांनी चोंभाळलं;
तू अधिकच उसवलीस नंतर माघारपणात
आधीचेच शिवलेले तोंड
कशी चाटायची मग स्वतःची आसवे ?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १८५९२
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0018592

REFBK-0018592

४३

दर्याच्या वादळी पंखावरून
प्रवास करणारे डोळे
त्यांना सापडले आहे आत्मबळ
विद्रोहाच्या हाकेमधले !